JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT
VOL. XIII (ISSUE. 14-B) APRIL 2022

# WOMEN EMPOWERMENT



## JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

A Multidisciplinary International Level Peer Reviewed Journal
ISSN : 22309578 Cosmos Impact factor : 7.265

Scanned with CamScanner

| S.N. | Title of Research Paper | Author | Page No |
|---|---|---|---|
| 18 | वाचनसंस्कृतीच्या माध्यमातून महिला सबलीकरण | प्रा. किशोर पंढरीनाथ भोळे | 71 |
| 19 | ग्रामपंचायत महिला प्रतिनीधी कुटुंब सहभाग आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. निलेश शांताराम चौधरी | 75 |
| 20 | महिला सक्षमीकरण-शासनाच्या विविध कल्याणकारी योजना | प्रा.डॉ.अस्मिता धनवंत सरवैया | 81 |
| 21 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढणाऱ्या कर्तृत्वान महिलांचे योगदान | डॉ. भारती प्रमोद गायकवाड | 84 |
| 22 | महिला सक्षमीकरणाची वाटचाल आणि सद्यस्थिती एक अभ्यास | डॉ. नितीन रामदास बडगुजर<br>डॉ. मोहिनी उदय उपासनी | 89 |
| 23 | महिला उद्योजकांसाठी शासनाचे धोरण | प्रा.डॉ.शाम दामू सोनवणे | 93 |
| 24 | ग्रामिण भागातील कुटुंबातील मुलींची शैक्षणिक स्थिती अध्ययन | प्रा. डॉ. श्वेता विनोद वैदय | 100 |
| 25 | महिला सक्षमीकरणात स्त्री-पुरुष समानतेची भूमिका | प्रा. डॉ.कल्पना दिलीप भारंबे | 106 |
| 26 | शेत मजुरी करणाऱ्या महिलांचे आरोग्य आणि उपाय | डॉ. प्रमोद एस. गायकवाड | 110 |
| 27 | स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण | प्रियंका प्रदिप झोपे<br>डॉ. राकेश पिताबर चौधरी | 113 |
| 28 | महिला सक्षमीकरणात महिलांचे कायदे, हक्क आणि शासकिय योजनांचे योगदान | डॉ. रत्नमाला विरेश पाटील | 119 |
| 29 | महिला सक्षमीकरण आणि महिलांची वास्तव स्थिती | डॉ. उमेश वाणी | 124 |
| 30 | वृद्ध महिलांच्या समस्या | भाग्यश्री पंडित गावित | 130 |
| 31 | महिला सबलीकरण काय आहे | दर्शन रवींद्र पाटील | 133 |
| 32 | विद्यार्थी संघटन आणि विद्यार्थिनी नेतृत्व विकास | रुचिका प्रशांत इंगळे | 135 |
| 33 | महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे आरोग्य | आयशा छब्बीर तडवी | 138 |
| 34 | कुटुंब जीवन शिक्षणाच्या माध्यमातुन महिलांचा विकास | स्नेहल जगदीश धांडे | 143 |
| 35 | Women Empowerment :Role in Sustainable Development | Jagtap Kalpana Baburao and Sunil Uttamrao Suryawanshi | 148 |
| 36 | Human right and Women | Mrudula Sahebrao Barde<br>Dr. Yashwant G. Mahajan | 151 |
| 37 | Women Empowerment -A key to Sustainable Development (Reference to Covid -19) | Sandip Madhukar Nimase<br>Dr. Sham Damu Sonawane | 155 |
| 38 | Development and challenges of Women | Geeta Patil | 159 |


Scanned with CamScanner

# महिला सक्षमीकरण-शासनाच्या विविध कल्याणकारी योजना

**प्रा.डॉ.अस्मिता धनवंत सरवैया**
सहायक प्राध्यापक,
पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,
अमळनेर ता.अमळनेर,जि. जळगाव

================================================================

**प्रस्तावना**

भारत हा विकसनशील देश असून, सतत विकास करत रहाणे हे भारताचे ध्येय आहे. कोणत्याही राष्ट्राची ओळख ही त्याच्या देशातील महिलांच्या व बालकांच्या ध्येय धोरणावर अवलंबून असते. ज्या देशात महिलांचा व बालकांचा विकास झालेला असतो ते राष्ट्र खऱ्या अर्थाने विकसनशील राष्ट्र म्हणून गणले जाते. निरंतर विकास हे प्रगत समाजाचे लक्षण आहे, अनुकूल आणि प्रतिकूल सामाजिक वातावरणाचा प्रभाव विकास प्रक्रियेवर दिसून येतो, देशाचे भावी मनुष्यबळ हे सक्षम व सुदृढ महिला विकासावर अवलंबून आहे. महिला हाच खरा देशाच्या भावी काळातील विकासाचा आधार स्तंभ असतो. मानसशास्त्रज्ञ व समाज शास्त्रज्ञांच्या मते ज महिलांचा सर्वांगीण विकास झाला तर महिलांचे व्यक्तिमत्व आणि पर्यायाने देशाचा आधारस्तंभ असलेले बालक या दोघांच्याही व्यक्तिमत्त्वावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. 130 कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या भारत देशातील महिलांच्या संदर्भातील धोरण हे सकारात्मक दृष्टिकोनातून अतिशय उजवे असल्याने महिला सक्षमीकरनात शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण विकासात्मक कार्यक्रम आहे. महिला अजूनही विकासापासून वंचित आहेत.त्यांना व्यवसायभिमुख शिक्षण व कौशल्यावर आधारित शिक्षण देणे गरजेचे आहे.तरच महिलांचा सर्वांगीण अर्थाने विकास होईल.

**उद्देश —**

अध्ययनाचे उद्देश हे अतिशय शास्त्रोक्त पध्यतीने द्वितीय स्रोताच्या माध्यमातून व कार्यात्मक संकल्पनेच्या आधारावरून निर्माण करण्यात आले आहेत.

१.. शासकीय योजना/उपक्रम या महिलांच्या सबलीकरणासाठी पुरेशा आहेत का? या विषयी माहिती जाणून घेणे.

**संशोधन पद्धती व तंत्रे —**

सदर शोधनिबंधाचे दुय्यम स्रोताच्या माध्यमातून योजनांची माहिती, सरकारी दस्तावेज, शासनाने या योजनांच्या संदर्भातील शासकीय निर्णय, शासकीय संकेत संकेतस्थळाचा उपयोग केला असून वर्णनात्मक संशोधन आराखडा याचा उपयोग केलेला आहे.

**गृहीत कृत्य-**

१. महिलांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी शासकीय योजना/उपक्रम पुरेशे आहेत.

**विषय विवेचन-**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामांत सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात. याशिवाय सर्वसमावेश असे महिला धोरणही राबविण्यात येत आहे. महिलांसाठीच्या योजनांचा



Scanned with CamScanner

थोडक्यात आढावा. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. मुलींसाठी सैनिकी शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. शासकीय कादपत्रांमध्ये पाल्यांच्या वडिलांसोबत आईच्या नावाचा उल्लेख सुध्दा केला जात आहे. महिलांसाठी सावित्रीबाई फुले योजना, मातृत्व अनुदान स्त्री, डॉक्टरच्या सेवा अशा अनेक योजना शासनाने महिला विषयक धोरणात जाहीर केल्या आहेत. शासनामार्फत महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सातत्यपूर्ण पध्दतीने राबविण्यात येत आहेत. महिलांची सुरक्षा आणि कल्याण यांची सर्वस्वी जबाबदारी शासनावर असते.

१. निराधारांसाठी शासनाचा आधार
२. बालिका समृध्दी योजना
३. इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना
४. देवदासी पुनर्वसन योजना
५. महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना
६. सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना
७. महिला बचत गट

**निराधारांसाठी शासनाचा आधार-**

निरक्षित महिलांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृहाची निर्मिती झाली. दरडोई मानधन दिले जाते. तसेच या महिलांना घराचे भाडे, औषध, प्रसाधन बाबतीतील साहित्य दिले जाते. ज्या महिलांचा सांभाळ करणार असं कोणी नाही, त्यांना आश्रय देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सुध्दा शासकीय महिला राज्यगृहे स्थापन केलेली आहेत. परितक्त्या, कुमारी माता, संकटग्रस्त अशा महिलांना आश्रय देण्यासाठी आश्रयस्थान उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्यांच्या आरोग्याची देखील येथे काळजी घेतली जाते, तसेच अन्न, वस्त्र, निवारा याची सोय करुन त्यांना प्रशिक्षण, शिक्षण तसेच कायदेशीर मार्गदर्शनही केले जाते.

**बालिका समृध्दी योजना-**

केंद्र शासनाच्या या योजनेअंतर्गत कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलींसाठी अर्थसाहाय्य दिले जाते. शहरी ग्रामीण बालिकांसाठी ही योजना राबवली जाते, परंतु त्या 1997 नंतर जन्मलेल्या असाव्यात. राष्ट्रीय बचत योजना, सार्वजनिक मनुष्य निर्वाह निधी इत्यादी योजनेत हा निधी गुंतवला जातो आणि मग दरवर्षी शिष्यवृत्तीच्या रुपाने त्यांना लाभ दिला जातो.

**इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना-**

पीडित महिलांसाठी इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना सुरु करण्यात आलेली आहे. पीडित महिलेचे पूर्णपणे पुनर्वसन होईपर्यंत मानधनाच्या स्वरुपात मदत दिली जाते.

**देवदासी पुनर्वसन योजना**

या योजनेअंतर्गत ज्या देवदासी असतात त्यांना किंवा त्यांच्या मुलींना विवाहासाठी 10 हजार रुपये इतके अनुदान दिले जाते. तसेच त्यांना शिक्षणासाठी सुध्दा प्रोत्साहित केले जाते. त्यांना शिक्षणासाठी 500 ते 600 रुपयापर्यंतचे अनुदान दिले जाते.

**महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना**

महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. यात निराधार निराश्रित राखीव गटातील स्त्रिया, विधवा अशा महिलांना प्राधान्य दिले जाते. यात उमेदवारांना ठरवून दिलेले विद्यावेतन नियमित मिळते.

**सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना**

शहरी भागातील महिलांसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक मदत भागविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अर्थसाहाय्य करणारी महिला स्वावलंबन योजना राबविते. कामधेनू योजनेद्वारे

महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात म्हणून अशा महिलांना 50 टक्के काम देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

**महिला बचत गट**

आज महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी स्वबळावर उभे राहिले पाहिजे, यासाठी शासन मदत करत असते. बचतगटांमुळे महिला अभ्यासू तसेच बोलक्या होऊन दुःखामधून सावरण्याची शक्ती त्यांना मिळत आहे. जिद्द, मेहनत, धाडस या बळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृध्दी खेचून आणता येऊ शकते. त्यासाठी त्यांना शासनाची सदैव साथ मिळत आहे.

**निष्कर्ष-**

स्वतंत्र भारतात महिलांना मूळ प्रवाहात सामावून घेण्याकरिता शासनाच्या वतीने योग्य उपाययोजना केल्या आहेत. त्या खरोखरच उल्लेखनीय आहे, विविध समाजातील महिला गटांचा विचार करताना असे लक्षात येते की, महिलांकडे शिक्षण जरी कमी असले तरी, त्यांची आर्थिक उन्नती व्हावी या दृष्टीने व त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न व योगदान अतिशय सकारात्मक आहे. रोजगार हा केवळ पुरुष संवर्गातील घटकांचा असून चालणार नाही तर त्यात महिलांनी देखील सहभागी होणे गरजेचे आहे, त्या दृष्टीने शासनाने उचललेली पावले महत्त्वपूर्ण असून महिलांनी देखील त्यांना त्यांचा सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. अनेक महिला या कागदपत्रांच्या अभावी मूलभूत सुविधांपासून वंचित राहतात. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण यांच्या किमान सुरक्षा पासून महिला वंचित रहाणे हे शासनाला मान्य नाही. कोणत्या महिलांचा शास्वत विकास होण्या करिता अजून नियोजन करणे आवश्यक आहे. अशा शश्वत विकासासाठी शासनाने विविध योजना व स्वयंरोजगार महिलांसाठी तयार केले आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिला स्वतः रोजगार निर्माण करतात व इतरांना देखील त्यात सहभागी करून घेतात अनेक महिला व्यवसाय प्रशिक्षण घेऊन स्वतःचा उदरनिर्वाह करतात शिवाय कुटुंबांची सुद्धा दखल घेताना दिसून येतात.समाजात अजूनही पुरुष प्रधान संस्कृती असल्याने कोणत्याही कार्यक्रमात हवा तितका सहभाग महिलांचा अजूनही दिसून येत नाही. ही उदासीनता मान्य करावी लागते.

**सूचना-**

1. महिलांच्या विकासासाठी केवळ शासनाने प्रयत्न करून चालणार नाही तर समाजातील प्रत्येक जबाबदार घटकाने विशेषतः पुरुष गटाने त्यांच्या सर्वांगीण कृतीचा सन्मान केला पाहीजे.
2. महिलांच्या विकासाठी फक्त शासकीय योजनाच पुरेशा नसून महिला वर्गाचा सहभाग मिळवण्यासाठी कौटुंबिक, सामाजिक प्रयत्न गरजेचे आहेत.
3. शासनाच्या महिलांविषयी च्या योजना अत्यंत विधायक असून त्यांना पुरेपूर लाभार्थी मिळण्यासाठी समाजकार्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांनी संस्थानी व सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या संस्थांनी वंचित असणाऱ्या महिलांचा शोध घेऊन त्यांना विकास प्रक्रियेत आणण्यासाठी प्रयत्न करावेत.

**संदर्भ सूची-**

1. कविता फाले-बोरीकर, जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर स्रोत : महान्यूज
2. कुलकर्णी अ.ना. भारतीय स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन, नागपूर
3. बोधनकर सुधीर,(2003) सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. www.google.com



Scanned with CamScanner